## अमळनेरात आज मोफत भव्य नेत्र तपासणी शिबिर

**अमळनेर । वार्ताहर**

जळगाव जिल्हा पालकमंत्री तथा पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री गुलाबराव पाटील यांच्या वाढदिवसानिमित्त ५ रोजी अमळनेर शिवसेना व यशोदा फाउंडेशन धुळे यांच्या संयुक्त विद्यमाने मोफत भव्य नेत्र तपासणी शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. शिवसेना संपर्क कार्यालय, भांडारकर कंपाऊंड (खड्डाजीन) बस स्टँड समोर, भागवत रोड येथे सकाळी ९ वाजेपासून शिबिराचे आयोजन केले असून शिबिराचे उद्घाटक पारोळा-एरंडोलचे आमदार अमोल पाटील असणार आहेत, तर प्रमुख पाहुणे शिवसेना जिल्हाप्रमुख वासुदेव पाटील जिल्हाप्रमुख (महिला) सरिता (माळी) कोल्हे यांची विशेष उपस्थिती लाभणार आहे. डॉ. श्रद्धा मोरे आणि डॉ. प्रशांत मोरे यांच्या मार्फत लाभार्थ्यांच्या डोळ्यांची तपासणी केली जाणार असून तालुक्यातील गरजूंनी शिबिराचा लाभ घेण्याचे आवाहन तालुकाप्रमुख सुरेश अर्जुन पाटील, शहरप्रमुख संजय कौतिक पाटील तसेच सर्व शिवसेना पदाधिकाऱ्यांनी केले आहे.



## ताडेपुरा येथे अहिल्याबाई होळकर जयंती साजरी

**अमळनेर । प्रतिनिधी**

लोकमाता, पुण्यश्लोक आहिल्या देवी होळकर यांची जयंती या वर्षी त्रिशताब्दी वर्ष संपूर्ण देशात उत्साहात साजरी केली जात आहे.

या धर्तीवर ताडेपुरा येथील नागरीकांनी मोठी सुबक प्रतिमा स्थापन केली.सामाजिक कार्यकर्ते धनराज धनगर,व धनराज चिंचोरे यांच्या हस्ते प्रतिमेचे उदघाटन झाले.भाजपा उपाध्यक्ष-चंद्रकांत कंखरे यांच्या हस्ते प्रतिमा पूजन केले गेले.या वेळी ताडेपुरा येथील समस्त धनगर समाज बांधव उपस्थित होते.



## कळमसरे ग्रामपंचायतीच्या वतीने अहिल्याबाई होळकर पुरस्कार प्रदान

**कळमसरे, ता.अमळनेर । वार्ताहर**

ग्रामपंचायत कळमसरे येथील सन २०२५ /२६ या वर्षाचा अहिल्याबाई होळकर पुरस्कार गावातील सामाजिक कार्यात नेहमी अग्रेसर असणाऱ्या दोन महिला विजया सुधाकर नेमाडे तसेच नीलिमा संजय महाजन यांना अहिल्याबाई होळकर जयंती दिनी ग्रामपंचायत कार्यालयात सरपंच जगदीश निकम,उपसरपंच जितेंद्रसिंग पाटील, ग्रामपंचायत सदस्य प्रमिला चौधरी, तसेच ग्रामपंचायत अधिकारी ज्ञानेश्वर पाटील यांच्या हस्ते सन्मानचिन्ह , सन्मानपत्र, शाल, श्रीफळ तसेच रोख पाचशे रुपये या स्वरूपात पुरस्कार प्रदान करण्यात आला. शासनाच्या आदेशान्वये दरवर्षी ग्रामपंचायत कळमसरेच्या वतीने पुण्यश्लोक अहिल्याबाई होळकर पुरस्कार गावातील सामाजिक कार्यात अग्रेसर असणाऱ्या दोन महिलांना दरवर्षाप्रमाणे याही वर्षी देण्यात आला. गावातील आरोग्य सेवेत अग्रेसर असणाऱ्या विजया नेमाडे तसेच बचत गटाच्या माध्यमातून महिला सशक्तिकरण करणाऱ्या नीलिमा महाजन यांना यावर्षी सदर पुरस्कार प्रदान करण्यात आला. यावेळी अंगणवाडी सेविका मदतनीस आशा सेविका सर्व सन्माननीय ग्रामपंचायत सदस्य उपस्थित होते.

# शेतीतून जाणाऱ्या अंकलेश्वर-बऱ्हाणपूर महामार्गाला यावल-रावेर तालुक्यातील शेतकऱ्यांचा जोरदार विरोध

**फैजपूर, ता.यावल । वार्ताहर**

अंकलेश्वर-बुऱ्हाणपूर ७५३ बी.ई. ६ राष्ट्रीय महामार्ग निर्माणासाठी भूसंपादनाच्या येणाऱ्या अडचणींवर चर्चा करण्यासाठी मंगळवारी केंद्रित राज्यमंत्री रक्षा खडसे यांनी फैजपूर येथे रावेर यावल चोपडा तालुक्यातील शेतकऱ्यांची बैठक आयोजित केली होती.या बैठकीत रावेर तालुक्यातील शेतकऱ्यांनी शेतीतून जाणाऱ्या महामार्गाला जोरदार विरोध दर्शविला.तर यावल व चोपडा तालुक्यातील शेतकऱ्यांनी या महामार्गाला संमती दर्शवली त्यामुळे तिन्ही तालुक्यातील शेतकरी व अधिकाऱ्यांमध्ये मध्ये गोंधळ उडाला यावेळी यावेळी केंद्रीय राज्यमंत्री ना.श्रीमती रक्षाताई खडसे यांनी आजची बैठक निर्णय घेण्यासाठी नाही तर फक्त चर्चेसाठी असल्याचे स्पष्ट करून गोंधळाला शांत केले. गेल्या अनेक वर्षांपासून प्रस्तावित असलेल्या अंकलेश्वर-बुऱ्हाणपूर महामार्ग राष्ट्रीय महामार्गाच्या चौपदरीकरणच्या कार्याला गती आली असून त्यासाठी ची अधिसूचना प्रसिध्द करण्यात आलेली आहे.या कामासाठी जमिनी अधिग्रहित भूसंपादन करण्यासाठी गाव निहाय माहिती राजपत्रात दिलेली आहे.या अनुषंगाने रावेर तालुक्यातील शेती मधून जाणाऱ्या मार्गाला रावेर तालुक्यातील शेतकऱ्यांनी तीव्र विरोध दर्शविला आहे. दरम्यान मंगळवारी शेतकऱ्यांची बाजू समजून घेण्यासाठी व त्यावर अडीअडचणी वर चर्चेच्या माध्यमातून तोडगा काढण्यासाठी या समुपदेशन बैठकीचे आयोजन केले होते.या बैठकीला केंद्रीय राज्यमंत्री रक्षाताई खडसे,आमदार अमोल जावळे,जिल्हाधिकारी आयुष प्रसाद,राष्ट्रीय महामार्ग प्रकल्प शिवाजी पवार,फैजपूर प्रांताधिकारी बबनराव काकडे, अंमळनेर प्रांताधिकारी नितीन नन्नवरे, जिल्हा अधिक्षक अभिलेख मगर,नगर रचना सहाय्यक संचालक राजेश पाटील,यावल तहसीलदार मोहनमाला नाझीरकर, चोपडा तहसीलदार भाऊसाहेब थोरात,यावल उपविभागीय सार्वजनिक बांधकाम कार्यकारी अभियंता जहांगीर तडवी, रावेर तहसीलदार बंडू कापसे यांच्यासह या राष्ट्रीय महामार्गाशी संबंधित सर्व विभागाचे अधिकारी उपस्थित होते.यावेळी रस्त्याच्या तांत्रिक बाबीचे सादरीकरण तसेच भूसंपादनाचे अधिकार त्याचा मिळणारा मोबदला या विषयी संबंधित अधिकारी यांनी त्या त्या विभागाअंर्तगत माहिती दिली.

**रक्षा खडसे** – या चर्चेदरम्यान केंद्रीय राज्यमंत्री रक्षा खडसे यांनी हा प्रकल्प विकासाला गती देणारा असून केळी,उद्योग, व्यापारासाठी महत्वकांक्षी ठरणार आहे.याचा सर्वसमावेशक विचार करून शेतकऱ्यांनी आपल्या हरकती नोंदवाव्या शेवटी आम्ही जनतेचे प्रतिनिधी आहे. या प्रकल्पाला ब्रेक लागला तर तो भविष्यात होणे अशक्य आहे. ज्या शेतकऱ्यांना हरकती नोंदवायच्या असतील त्यांनी एकवीस दिवसांच्या प्रांत कार्यालयात नोंदवाव्यात.

**पाच पटीने मोबदला** – या राष्ट्रीय महामार्गासाठी भूसंपादित केल्या जाणाऱ्या शेतजमिनीला चार पटीने मोबदला व एक टक्का दिलासा रक्कम अशी पाच पटीने भरपाई दिली जाणार आहे.तसेच या प्रकल्पासाठी कोणाचीही मोठया प्रमाणावर जमीन जाणार नसून केवळ काही गुंठयात जाणार आहे.भूमिहीन कोणीही होणार नाही. अफवा व गैरसमज ला कोणीही बळी पडू नका.समृद्धी महामार्ग व राष्ट्रीय महामार्ग यांच्या मोबदल्यात कोणताही फरक राहणार नाही.असे जिल्हाधिकारी आयुष्य प्रसाद यांनी सांगितले.



**एकवीस दिवसांत हरकती मागविल्या** – ज्या शेतकऱ्यांची महामार्गात शेतजमीन जाणार असेल त्यांनी एकवीस दिवसांच्या आंत फैजपूर प्रांत कार्यालयात व अमळनेर प्रांत कार्यालय अंतर्गत चोपडा तहसिल कार्यालयात आपल्या हरकती नोंदवाव्यात.अशी माहिती जिल्हाधिकारी आयुष्य प्रसाद यांनी चर्चेदरम्यान दिली.

**आम्हाला भूमिहीन करू नका** – तामसवाडी. ता.रावेर येथीलभाविका अनिल पाटी लया युवतीचा आज वाढदिवस असतांना तिने व्यासपीठावर चढून भूसंपादनाच्या विरोधात आपली व्यथा मांडत आम्हाला भूमिहीन करू नका अशी भावनिक साद उपस्थितांना घातली.

**–भाविका पाटील**

# पाडळसे-अकलूद तापी नदी पुलापर्यंत वाहतूक कोंडी

**पाडळसे, ता. यावल । वार्ताहर**

बकरी ईदच्या पार्श्वभूमीवर आणि शेवटचा बुधवार असल्याने, फैजपूर-भुसावळ राज्यमार्गावर पाडळसे ते अकलूद (तापी नदी पूल) पर्यंत प्रचंड वाहतूक कोंडी झाली होती. सकाळी ७ ते १२:३० वाजेपर्यंत संपूर्ण वाहतूक ठप्प झाल्याने प्रवाशांचे, विशेषतः विद्यार्थ्यांचे मोठे हाल झाले.

यापूर्वी फैजपूर शहरात भरणारा बकरी बाजारामुळे मोठ्या प्रमाणात वाहतूक कोंडी होत होती. या वाहतूक कोंडीत एक म्बुलन्स अडकल्याने समाज माध्यमांत टीका झाली होती. या पार्श्वभूमीवर, यावल कृषी उत्पन्न बाजार समितीने मंगळवार, दि. ४ जून रोजी **भोरटेक पाडळसे उपबाजार समिती आवारात बकरी बाजार भरवला होता.** ईद जवळ आल्याने आणि आठवड्यातील शेवटचा बाजार असल्याने बकरा खरेदी-विक्रीसाठी व्यापारी आणि ग्राहकांची प्रचंड गर्दी झाली होती.

काल रात्री जोरदार पाऊस झाल्यामुळे काही वाहनधारकांनी आपली चारचाकी वाहने राज्यमार्गाच्या कडेला उभी केली होती. यामुळे भोरटेक उपबाजार समितीपासून ते पाडळसे गावापर्यंत, तसेच भोरटेक फाट्यापासून ते तापी नदीच्या अकलूद गावापर्यंत वाहनांच्या प्रचंड रांगा लागल्या होत्या. सकाळची वेळ असल्याने शिक्षणासाठी भुसावळकडे जाणाऱ्या विद्यार्थ्यांना या वाहतूक कोंडीचा मोठा फटका बसला. अनेक **महामंडळाच्या बसेस** देखील या ट्राफिकमध्ये अडकल्या होत्या. फैजपूर पोलिसांची वाहतूक सुरळीत करण्यासाठी प्रचंड दमछाक होत होती. या ट्राफिक जाममध्ये आपत्कालीन स्थितीतील म्बुलन्स देखील जाऊ शकली नसती व मोठी दुर्घटना घडली असती, असे बोलले जात आहे.

## बकरी ईद : बकरा बाजाराला फटका



बाजार समिती शेजारील पेपर मिल च्या प्रवेशद्वारासमोर चार चाकी वाहने उभे केल्याने कामगार आणि बकरा वाहतूक करणाऱ्यांमध्ये वाद; दोन चारचाकी गाड्यांच्या काचा फोडल्या.

बाजार समिती शेजारील पेपर मिलमधील कामगार आणि बकरा वाहतूक करणाऱ्या काही व्यक्तींमध्ये वाद झाल्याची घटनाही यावेळी घडली. या वादातून दोन चारचाकी गाड्यांच्या काचा फोडण्यात आल्याचे समजते. या घटनेमुळे तणावात भर पडली.



## शिबिरातून गरीब रुग्णांची सेवा घडते -प्रल्हाद बोंडे

**निंभोरा, ता.रावेर । वार्ताहर**

ग्रामीण भागामध्ये आरोग्य तपासणी शिबिरातून गरीब रुग्णांची सेवा घडते व गरीब रुग्णांना मदत होते असे प्रतिपादन निंभोरा बुद्रुक तालुका रावेर येथे आयोजित गोदावरी फाउंडेशन जिजाऊ क्लिनिक ,आई रेणुका मेडिकल यांच्या संयुक्त विद्यमाने झालेल्या भव्य आरोग्य तपासणी शिबिर उद्घाटन प्रसंगी श्री प्रल्हाद भाऊ बोंडे यांनी व्यक्त केले यावेळी डॉक्टर उल्हास पाटील वैद्यकीय महाविद्यालय व धर्मादाय रुग्णालय तर्फे डॉ . उल्हास पाटील, डॉ.वर्षा पाटील,डॉक्टर केतकी पाटील ,डॉक्टर वैभव पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली डॉक्टर रोहित कोळी, डॉक्टर सुशांत ,डॉक्टर तेजस यांनी रुग्णांची तपासणी केली. यावेळी निंभोरा येथील डॉक्टर नम्रता पाटील ,डॉक्टर सुधाकर चौधरी, डॉक्टर दिलीप झोपे,डॉक्टर विजय पाटील, डॉक्टर महेंद्र भालेराव ,डॉक्टर जयेश वाणी, यांचे विशेष सहकार्य लाभले .यावेळी आलेल्या सर्व मान्यवरांचे स्वागत माजी सरपंच व तंटामुक्त समिती अध्यक्ष श्री डीगंबर भाऊ चौधरी, चंद्रकांत चौधरी यांनी केले. या शिबिराच्या उद्घाटन सोहळ्यास सपोनि हरिदास बोचरे , कडू धोंडू चौधरी,प्रल्हाद बोंडे ,नरेंद्र ढाके ,सचिन चौधरी, ललित कोळंबे ,दुर्गादास पाटील, पोका अमोल वाघ,राजीव बोरसे ,सुनील कोंडे, भूषण चौधरी,राजू भोगे, गिरीश भंगाळे, सुरेश चौधरी, विजय बोंडे ,हरीश नेहेते, सतीश पाटील ,मनोहर तायडे ,रमेशचंद्र चौधरी, काशिनाथ शेलोडे,भास्कर महाले , राजु पाटील,दिलशाद शेख,दस्तगीर खाटिक, किशोर चौधरी,डॉ. स्वप्नील भंगाळे, डॉ.राहुल महाजन, पुष्पक चौधरी, दिपक सोनवणे, राहुल गुरव,किरण सपकाळे,अक्षय महाले, रुपेश वारके, धीरज भंगाळे, रितेश चौधरी, विशाल तायडे, विलास पाटील यासह आदी मान्यवर व ग्रामस्थ मोठ्या प्रमाणात उपस्थित होते या शिबिरात बऱ्याच जणांनी आपली आरोग्य तपासणी करून शिबिराचा लाभ घेतला. शिबिर यशस्वी होण्यासाठी पवन डीगंबर चौधरी यांनी परिश्रम घेऊन आभार मानले.

## बामणोदला केवायसी शिबिराला प्रतिसाद

**यावल । प्रतिनिधी**

महाराष्ट्र शासनाच्या इमारत बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळाच्या महिला गृहपयोगी योजनांच्या केवायसी साठी ग्रामीण भागातील महिलांना जिल्ह्याच्या ठिकाणी जळगाव येथे जावे लागत होते त्या अडचणी लक्षात घेता तालुक्याचे लोकप्रिय आमदार अमोल दादा जावळे यांच्या प्रयत्नांनी बामनोद येथे केवायसी शिबिराचे आयोजन केले होते.

या शिबिराच्या दिवशी बामनोद म्हैसवाडी पिंपरूड, विरोदे व काही न्हावी येथील महिलांनी व पुरुषांनी उस्फूर्त प्रतिसाद देत असताना मोठी गर्दी केली होती. शिबिर हे विविध कार्यकारी सहकारी सोसा बामनोद येथील आवारामध्ये व ऑफिसमध्ये घेण्यात आले चेअरमन सुवर्ण लता नरेंद्र कोल्हे व संचालक यांच्या वतीने जागा उपलब्ध करण्यात आली शिबिरामध्ये साडेतीनशे महिला व पुरुषांनी भाग घेतला नोंदणी केली ज्यांनी नोंदणी केली त्यांचे केवायसी कागदपत्रे पाहून पूर्ण करून घेतली केवायसी पूर्ण झालेल्या लाभार्थ्यांना जिल्हा वरून भांडी आल्यानंतर वितरित केली जाणार आहे. शिबिर संपन्न करण्याकरता भाजपाचे मंडळ अध्यक्ष उमेश बेंडाळे व सभापती पंचायत समिती यावल डॉ. नरेंद्र कोल्हे, गिरीश तळेले, प्रशांत सरोदे, अनंत फेगडे, दिनकर भंगाळे, प्रल्हाद केदारे, विकास सोसायटीचे सचिव हेमंत वारके, सुनील नेमाडे, खेमचंद नेमाडे, अतुल कोल्हे, जगन सोनवणे अमोल चौधरी, निखिल नेहते, पंकज कोल्हे यांनी परिश्रम घेतले.

(पान ४ वरुन) गुणवत्तेची पावती आहे. आपल्या मतदारसंघातील दोन मोठी गावं धरणगाव आणि पाळधी या ठिकाणी जलजीवन मिशन अंतर्गत त्यांनी केलेल्या पाणीपुरवठा योजना पूर्ण ताकदीनिशी सुरू झाल्या आहेत. यामुळे या दोन्ही गावातील वर्षानुवर्षाची पाण्याची समस्या सुटलेली आहे.

**डीपीडीसी ची विक्रमी गुंतवणूक :–** जिल्ह्याच्या विकासासाठी शासनातर्फे मोठ्या प्रमाणावर निधी उपलब्ध केला जातो. या निधीतून जिल्ह्याच्या अत्यावश्यक गरजा पूर्ण करणे, विकास करणे हा उद्देश असतो. या कामासाठी मंजूर झालेला निधी १००% वापरणे हे त्या त्या क्षेत्रातील आमदार, खासदार, मंत्री यांचे कर्तव्य असते. जळगाव जिल्ह्यामध्ये डी पी डी सी चा १००% निधी हा विकास कामांसाठी वापरला जातो. अशा प्रकारे संपूर्ण निधी खर्च करणारा जिल्हा म्हणून संपूर्ण राज्यांमध्ये जळगाव जिल्ह्याचा उल्लेख केला जातो. याचे सारे श्रेय पालकमंत्री म्हणून ना. गुलाबराव पाटील यांच्या पदरात पडते. गेल्यावर्षी मंजूर झालेल्या निधीपैकी फक्त ३ रुपयाचा निधी परत गेला होता. हा आपला स्वतःचा विक्रम मोडत ना. गुलाबराव पाटील यांनी यावर्षी देखील मंजूर झालेल्या निधीपैकी शंभर टक्के निधी खर्च केला असून त्यातून फक्त एक रुपया निधी हा परत गेलेला आहे. यातून ना. पाटील यांची कार्यतत्परता दिसून येते. यातूनच त्यांचे सूक्ष्म नियोजन, नियोजनासाठी लागणारी दूरदृष्टी आणि भविष्यातील संकल्पनांचा ध्यास या गोष्टी अधोरेखित होतात. हीच गुलाबराव पाटील यांच्या नेतृत्वाची शैली आहे. कार्य करण्याची त्रिसूत्री आहे. जी अनेकांना मोहात पाडते. ना. पाटील यांच्या धडाकेबाज कामामुळे जिल्ह्यातील गाव आणि गाव हे चांगल्या रस्त्यांनी जोडले जात आहे. जुन्या रस्त्याने कात टाकले असून त्यांनी नवे रूप धारण केले आहे. यामुळे ग्रामीण भागातील प्रवाशांचा प्रवास सुखकर झाला आहे. जळगाव जिल्ह्यात वारकरी संप्रदायाचे मोठे प्रस्थ असून या जिल्ह्यातून अनेक दिंड्या पंढरपूरसाठी जातात. या वारकऱ्यांसाठी जळगाव येथे भव्य दिव्य असे वारकरी भवन उभारण्यात आले आहे. वारकऱ्यांची या ठिकाणी राहण्याची व्यवस्था करण्यात आलेली आहे. **शिक्षण :–** देशाचे भविष्य ग्रामीण भागातील जिल्हा परिषदेच्या शाळेमध्ये घडत आहे. या शाळांमध्ये शिक्षण घेत असलेले ग्रामीण विद्यार्थी हे उदयाच्या भारताचे नागरिक असतील आणि तेच देशाचा विकास घडवतील हा संकल्प नामदार पाटील यांच्या मनात आहे. त्यांनी ग्रामीण भागातून शिक्षण घेऊन आपली कारकीर्द उभी केली आहे. त्यांना ग्रामीण भागातील शिक्षण व्यवस्थेची वस्तुस्थिती माहित आहे. ग्रामीण भागात गाव तेथे शाळा कार्यान्वित केलेली असून ज्या ठिकाणी शाळा आहे त्या ठिकाणी शाळेला सुरक्षितता मिळावी यासाठी कंपाउंड वॉल अर्थात सुरक्षा भिंत बांधण्याची योजना सुरू केली आहे. या अंतर्गत ग्रामीण भागातील जिपच्या सर्व शाळांना संरक्षण भिंतीचे कवच उपलब्ध करून दिले आहे. यामुळे शाळेची सुरक्षितता वाढली असून विद्यार्थ्यांच्या संस्कारांवर त्याचा चांगला परिणाम होत आहे. प्रत्येक शाळेत शिक्षणाचा दर्जा उंचावा यासाठी शिक्षकांनीही वेळोवेळी प्रशिक्षण घेतली पाहिजे यासाठी ते प्रयत्न करत आहेत त्यामुळे विद्यार्थ्यांची गुणवत्ता वाढेल आणि ते मुख्य प्रवाहात येतील हा त्यांचा ध्यास आहे. नामदार पाटील यांच्या जीपीएस संस्थेमार्फत दरवर्षी दीड लाख व यांचे मोफत वाटप करण्यात येते यामुळे पालकांवर पडणारा व यांचा बोजा हा सहज हलका केला जातो. ग्रामीण भागातून स्पर्धा परीक्षेसाठी बसणाऱ्या विद्यार्थ्यांची संख्या दिवसेंदिवस वाढत आहे त्यात पोलीस भरती एमपीएससी यूपीएससी साठी प्रयत्न करणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी नामदार गुलाबराव पाटील यांच्या माध्यमातून अत्यावश्य कशी पुस्तकांची सेवा उपलब्ध केली जात आहे प्रशिक्षण केंद्रांना देखील त्यांच्या संस्थेमार्फत आवश्यक ती मदत उपलब्ध करून दिली जात आहे.

# मोदींचं पाणीदार स्वप्नं साकारणारा जलदूत : ना.गुलाबराव पाटील



**महिला सक्षमीकरण :–** महाराष्ट्र शासनाने लाडकी बहीण योजना अमलात आणण्यापूर्वीच ना. पाटील यांनी जळगाव जिल्ह्यामध्ये महिला बचत गटांच्या माध्यमातून ग्रामीण भागातील महिलांचे प्रभावी असे संघटन उभे केले आहे. त्यातून महिलांच्या सक्षमीकरणासाठी व त्यांनी उत्पादित केलेल्या साहित्यासाठी बाजारपेठ कशी उपलब्ध करून देता येईल या दृष्टीने जिल्ह्यात मॉल उभे राहणार आहेत. असे प्रत्येकी दोन कोटी खर्चाचे अकरा गटांमध्ये बहिणाबाई वातानुकूलित मॉल उभे राहणार आहेत. या माध्यमातून बचत गटांच्या महिलांसाठी एक सुशासित विक्री व्यवस्था उपलब्ध होणार आहे. या दृष्टीने संपूर्ण जिल्ह्याचे नियोजन करून प्रत्येक बचत गटाला विशिष्ट काळापुरते हे मॉल वापरता येणार असून यामुळे प्रत्येक गटाला आपल्या गटाचे वैशिष्ट्य जिल्हा समोर प्रदर्शित करता येणार आहे. या माध्यमातून महिला बचत गटांचे उमेद अभियान सुरू झाले आहे. ना. गुलाबराव पाटील जेव्हा या महिलांशी संवाद साधतात तेव्हा त्यांच्या कार्याला उमेदीचे धुमारे फुटतात. भविष्यात हा प्रकल्प राज्यात लक्षवेधी ठरणार आहे.

**ऊर्जा :–** ग्रामीण आणि शहरी भागामध्ये ऊर्जा हा महत्त्वाचा विषय आहे. ग्रामीण भागात शेतकऱ्यांना शेतीसाठी आणि शहरी भागात नागरिकांना घरगुती तर उद्योजकांना उद्योगासाठी योग्य प्रमाणात आणि वेळेवर वीज उपलब्ध होणे ही काळाची गरज आहे. ही गरज पूर्ण होण्याच्या दृष्टीने एम एस सी बी च्या माध्यमातून पूर्ण लक्ष दिले जात आहे.

**सिंचन :–** केंद्राकडून आवश्यक तो निधी मिळावा यासाठी ना. पाटील प्रयत्न करत आहेत. हे सर्व प्रकल्प त्यांच्या पूर्ण क्षमतेनिशी कार्यरत झाल्यास भविष्यात जळगाव जिल्हा सुजलाम सुफलाम झाल्याशिवाय राहणार नाही. गिरणा नदीतून वेळोवेळी येणारे पाणी वाहून जाण्याऐवजी ते अडवून धरले तर त्याचा शेतकऱ्यांना आणि ग्रामीण भागातील नागरिकांना पिण्याच्या पाण्यासाठी मोठ्या प्रमाणावर उपयोग होणार आहे. ही गरज ओळखून ना. पाटील यांनी गिरणा नदीत बलून बंधाऱ्यांची संकल्पना आखलेली आहे. यासाठी दीडशे ते दोनशे कोटी रुपयांची आवश्यकता असून हा निधी राज्य शासनाकडून उपलब्ध होऊ शकतो. ही पूर्तता जलसंपदा मंत्री ना. गिरीशभाऊ महाजन करू शकतात. ना. गुलाबराव पाटील आणि नामदार गुलाबराव गिरीशभाऊ महाजन यांचे मैत्रीपूर्ण संबंध बघता हा उपक्रम देखील भविष्यात प्रत्यक्षात साकार होईल असा विश्वास नामदार पाटील व्यक्त करतात.

**सुरक्षा :–** जिल्ह्यातील कायदा आणि सुरक्षा सुदृढ ठेवण्याचे काम पोलीस यंत्रणेमार्फत राबविले जाते. त्यासाठी पोलीस यंत्रणा अत्याधुनिक आणि सक्षम असावी हा ना. गुलाबराव पाटील यांचा प्रयत्न आहे. त्या दृष्टीने त्यांनी जिल्ह्यातील २०० बीट मध्ये हवालदारांना २०० मोटरसायकली उपलब्ध करून दिल्या आहेत. जिल्ह्यातील पोलीस यंत्रणेसाठी त्यांनी नवीन १०० पोलीस व्हॅन उपलब्ध करून दिल्या आहेत. यातून पोलीस यंत्रणा त्वरित संपर्क साधण्यात यशस्वी होणार आहेत.

**स्वच्छता :–** पाणीपुरवठा मंत्री यासोबतच स्वच्छता मंत्री ही जबाबदारी देखील ना. गुलाबराव पाटील यांच्याकडे आल्यामुळे संपूर्ण जिल्ह्यातील स्वच्छता अभियानाकडे देखील त्यांनी आपली नजर वळवली आहे. गावागावातून, घराघरातून गोळा होणारा ओला कचरा, सुका कचरा वेळेवर गोळा करणे, त्याची योग्य विल्हेवाट लावणे, कचऱ्यापासून खत निर्मिती करणे या गोष्टींसाठी त्यांनी स्वतंत्र यंत्रणा कार्याला लावली आहे. त्याचे दृश्य परिणाम दिसायला लागले आहेत. गावागावात स्वच्छता वाढली असून यामुळे रोगराईचे प्रमाण कमी झालेले आहे. पावसाळ्यात याचे सकारात्मक परिणाम दिसून येतील. धरणगाव नगरपालिकेने सुरू केलेला घनकचरा व्यवस्थापनाचा प्रकल्प यशस्वी झाला असून या प्रकल्प अंतर्गत गावातून गोळा होणारा घनकचरा एकत्रित केला जातो. त्यातून खताची निर्मिती केली जाते. या ठिकाणी निर्माण होणारे खत हे १००% विक्री होत असून त्यामुळे टाकाऊ मधून टिकाऊ ही संकल्पना प्रत्यक्षात साकारली जात आहे. हा पथदर्शी प्रकल्प यशस्वी झाल्यामुळे जिल्हाभरातून याची अंमलबजावणी केली जाणार आहे.

**बर्तन बँक :–** वेळोवेळी प्रसंगानुरूप समाजामध्ये विविध सोहळे साजरे होतात. या निमित्ताने भोजनावळी उठतात. या भोजनावळीतून प्लास्टिकचा मोठ्या प्रमाणावर वापर केला जातो. हे प्लास्टिक म्हणजे कधीही नष्ट न होणारा कचरा आहे. या समस्येवर कायमस्वरूपी उपाय म्हणून धरणगाव नगरपालिकेने ना. पाटील यांचे मार्गदर्शनाखाली बर्तन-बँक हा अभिनव उपक्रम सुरू केलेला आहे. या उपक्रमांतर्गत धरणगाव नगरपालिकेमध्ये एखाद्या विवाह सोहळ्यासाठी किंवा प्रासंगिक कार्यक्रमासाठी लागणारे ताट, ग्लास, वाट्या उपलब्ध करून देण्यात आलेल्या आहेत. अत्यल्प दरात ही सेवा उपलब्ध असून यामुळे प्लास्टिकच्या पत्रावळी, द्रोण, ग्लास यांच्या वापरावर नियंत्रण ठेवता येणार आहे. हा प्रकल्प यशस्वी झाल्यास संपूर्ण राज्यात हा राबवला जाईल असा विश्वास ना. गुलाबराव पाटील यांनी व्यक्त केलेला आहे. प्लास्टिक कचऱ्यापासून मुक्ती मिळवण्यासाठी बर्तन बँक ही अभिनव संकल्पना असल्याचे त्यांनी नमूद केले आहे. धरणगाव नगरपालिकेचे मुख्याधिकारी रामनिवास झंवर यांनी ना. गुलाबराव पाटील यांचे स्वप्न साकार करून ते प्रत्यक्षात कार्यान्वित केलेले आहे.

**निर्विवाद वर्चस्व :–** ना. गुलाबराव पाटील हे वक्तृत्व, नेतृत्व आणि कर्तृत्व या तिन्ही आघाड्यांवर यशस्वी झाले आहेत. मतदारसंघ, जिल्हा या त्यांच्या कार्यक्षेत्रात त्यांनी निर्विवाद वर्चस्व सिद्ध केले आहे. त्यांच्या कामाचा झपाटा आणि नेतृत्वाची दिशा ओळखून त्यांचे अनेक विरोधक त्यांचे पाठीराखे, सहकारी, कार्यकर्ते झाले आहेत. दूर दृष्टी असलेला हा सर्वसमावेशक नेता आता राज्यस्तरावर स्थिरावला आहे. त्यांच्या बहुपयोगी, दूरदृष्टीच्या योजना, संकल्पना राष्ट्रीय स्तरावर पोहचल्या आहेत. अश्या या लोकनेत्याचे कार्यक्षेत्र आणि नेतृत्व अधिकाधीक विस्तारीत होवो. लोकोत्तर होवो आणि त्यांच्या हातून जनतेचे कल्याण होवो, या शुभेच्छा.!

देशदूत

हे दैनिक मुद्रक व प्रकाशक **राजेंद्र कृष्णराव सोनवणे** यांनी श्रीरंग प्रकाशन प्रा.लि.यांच्याकरिता सकाळ मीडिया प्रा.लि., प्लॉट नं.सी-३, एम.आय.डी.सी.एरिया टेलिफोन एक्सचेंजसमोर, औरंगाबाद रोड, जळगाव-४२५००३ (महाराष्ट्र) येथे मुद्रित करून देशदूत कार्यालय, ई-७/९, व.वा.मार्केट (गोलाणी मार्केट) दुसरा मजला, नवी पेठ जळगाव येथे प्रसिध्द केले. ● **संपादक : हेमंत दिनेश अलोने***. **फोन नं.**: जळगाव शहर कार्यालय-२२२८७८१, २२२४६६०, भुसावळ-२२०६८०, २२४७९५, रावेर-२५०४४४, धुळे-२३७९१४, फॅक्स-२३८९१४, नंदुरबार २२११०१. **RNI.No. 68337/1997** पोस्टाने पाठविण्याचा परवाना क्र. **JAL./123/2018-2020** (* पी.आर.बी.कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांच्यावर आहे.)

cmyk